e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# दूरदर्शनवरील बातमी संहिता लेखनाची वैशिष्ट्ये

**प्रा. विक्रम उकर्डा मोरे**

गो.से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय,

खामगाव जिल्हा बुलढाणा.

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.53

प्रस्तावना:

वर्तमान युग हे संज्ञापन क्रांतीचे युग आहे. या युगास माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हटले जाते. संप्रेषणाच्या भूमिकेत प्रसार माध्यमं अतिशय महत्वाची भूमिका बजावतात.मानवाच्या संज्ञापनाच्या गरजेतून वेगवेगळे शोध लागत गेले आणि आज संज्ञापन क्रांती घडली. आज इंटरनेट क्रांती घडली आहे, आपण अनुभवतो आहे.क्षणात जगाच्या संपर्कात आपणास येता येते, अशा प्रकारचे तंत्रज्ञान विकसित झाले. समाज माध्यमातून गतीने व्यक्त होण्यासाठी फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, टेलिग्राम, रिलस, युट्यूब इत्यादी समाज माध्यमातून क्षणार्धात जगाशी कनेक्ट होता येत. .यासाठी भाषा हे साधनं अनिवार्य आहे. चिन्हांकित इमोजी ची, आकृतीची भाषा ही मर्यादा ठरते. भाषेशिवाय मनुष्याला तंत्रातून व्यक्त होण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. चित्र, इमोजी, आकृत्या, संकेत हे मर्यादित अर्थाने माध्यमाचे काम करत असले ,तरी त्याला मर्यादा आहे. भाषा आणि तंत्रज्ञान याची जोड करून मानवाने प्रगती साधली. भाषा ही मानवी व्यवहारातील अतिशय महत्वाची गोष्ट आहे. मानव समूह भाषेशीवाय विविध क्षेत्रात काम करूच शकत नाही. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, इंटरनेट, फोन, मोबाईल, चित्रपट, नाटक, ग्रंथ ही सारी प्रसारमाध्यमच आहेत. ही सारी माध्यमं भाषेच्या कौशल्यावर आधारलेली आहेत, यात शंकाच नाही. या प्रत्येक माध्यमांच्या भाषचे स्वरूप वेगवेगळ् आहे. व्यक्त होण्यासाठी अविष्कारात माध्यम परतवे बदल केले जातात. त्यासाठी विशिष्ट रचना करावी लागते, एक प्रारूप अथवा संहिता तयार करून माध्यमाच्या अनुसार संहिता लेखन आवश्यक ठरते. त्याशिवाय संप्रेषणाचे कार्य होऊ शकत नाही. मानवाच्या दैनंदिन जीवनात प्रसार माध्यमांचे महत्त्व वाढत आहे. असा एकही व्यक्ती आढळणार नाही, जो दूरदर्शन किंवा दूरचित्रवाणी पाहत नाही. कुठल्यातरी मीडियाच्या संपर्कात तो असतोच त्याच्या आस्वादनासाठी नियोजित प्रारूप भाषेचे तयार असावे लागते, तरच आस्वादन प्रक्रिया पूर्ण होते.या प्रसार माध्यमाचे आस्वादन स्वरूप हे संहिता लेखनावर अवलंबून आहे. त्या दृष्टिकोनातून प्रसारमाध्यमांसाठी संहिता लेखन आवश्यक ठरते. प्रस्तुत निबंधात दूरदर्शन वरील बातमी संहिता लेखन कौशल्य याचा विचार

© 2024, SK Publisher All Rights Reserved 

करण्यात आला आहे." मुद्रित माध्यमापेक्षा दृकश्राव्य माध्यमाचे स्वरूप खूपच भिन्न आहे. येथे जो मजकूर प्रसारित केला जातो तो प्रेक्षकापर्यंत सअभिनय सादर होत असतो. कानाला आणि डोळ्याला एकाच वेळी चालना मिळत असते म्हणून दूरदर्शन हे प्रभावी माध्यम आहे.", असे डॉ. संदीप सांगळे म्हणतात. समाजाने आणि संस्कृतीच्या जडणघडणीत प्रसार माध्यमाची भूमिका क्रांतिकारक आहे. मानवी संप्रेषणाला अधिक गतिमान करण्याचं काम दृकश्राव्य माध्यम करतात. दूरदर्शन माध्यमांतून व्यक्त व्हायला भाषा ही प्रभावी, नियोजित असावी लागते, त्यासाठी एक भाषा संहिता महत्त्वाची आहे.

कोणत्याही माध्यमातून व्यक्त होण्यासाठी भाषेची संहिता, प्रारूप, आराखडा तयार केला जातो. आपल्या मनातील कल्पना, विषय, विचार याला दृश्यांसोबतसोबत मांडणी करायची असते. प्रामुख्याने दूरदर्शन साठी संहिता लेखन करताना श्राव्य भागापेक्षा दृश्य भागाला महत्त्व आहे. येथे आपल्या मनातील एक एका वाक्यासाठी दृश्यांची साखळीच तयार होते. दृश्याच्या आधाराने आपल्या मनातील विचार येथे पोहोचवला जातो. सर्वसाधारणपणे आपली अभिव्यक्तीची पद्धत 'शब्दप्रधान' असते. दूरदर्शन सारख्या माध्यमांसाठी संहिता लेखन करताना शब्दांना कमी महत्त्व द्यायचे आणि डोळ्यासमोर दृश्य आणावयाची असतात. दृश्यातून व्यक्त करायचे असते.त्यास दृश्य विचारशक्ती असे म्हणतात.(Visual thinking) डोळ्यासमोर दृश्य आणायचे आणि त्यातून व्यक्त व्हायचे हे महत्त्वाचे.उदा.`त्याला आज पावसामुळे पोहोचायला उशीर झाला'. ही एक कल्पना आपल्यापुढे आहे. हे वाक्य, त्यातील शब्द आपल्या मनात उमटले.परंतू दुसऱ्याच्या मनाशी आपणास ही गोष्ट पोहोचावयाचीआहे.त्यासाठी एक एक दृश्य आपल्याला डोळ्यापुढे आणता आली पाहिजे. दृश्य पहिले -पाऊस कोसळत आहे सर्व रस्ते पाण्याने भरून वाहत आहेत.

दृश्य दुसरे- तो व्यक्ती पाऊस थांबण्याची वाट पाहत आहे, गॅलरीत उभा आहे .दृश्य तिसरे- तो व्यक्ती वारंवार घड्याळाकडे पाहत आहे, त्याच्या चेहऱ्यावर अस्वस्थता जाणवत आहे. चौथ्यादृश्यात -तो छत्री घेऊन पावसात निघतो आहे. सहाव्या दुसऱ्या इच्छित स्थळी पोहोचला आहे, त्याला धाप लागली आहे. कामावर उशीर पोचल्यामुळे अपराधीपणाची भावना त्याच्या चेहऱ्यावर आहे. असे असे दृश्य चित्रण साखळी आपल्या मनात तयार होते दृश्याचे हे टप्पे टप्पे संहिता लेखनात मोजक्या शब्दांनी व्यक्त होतात ही दृश्य विभागणी संहिता लेखनात ,लक्षात घेणे गरजेचे असते.

संहिता कशाला म्हणतात ते पुढे पाहू.

**संहिता म्हणजे काय?**

**कार्यक्रमाच्या चित्रीकरणासाठी आपल्या मनातील कल्पना कोणत्या दृश्यांमधून मांडायचा आहे त्या दृश्या सोबत कोणत्या प्रकारचे निवेदन, संवाद व ध्वनीचा वापर आपल्याला अपेक्षित आहे त्याच्या तपशीलवार क्रमशः सूचना निर्मात्यासाठी कागदावर लिहिणे याला संहिता असे म्हणतात.**

दूरदर्शन वरच्या कार्यक्रमाची निर्मिती ही सामूहिक निर्मिती असते त्यामध्ये अनेक जणांचा सहभाग असतो लेखकाच्या मनात असलेले विचार प्रेक्षकापर्यंत पोहोचण्यासाठी निर्मात्याजवळ संहिता हेच साधन असते. निर्मात्याला त्या संहितेनुसार कार्य करून घ्यायचे असते. हे करत असताना मूळ आशयाला धक्का लागू नये याची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी ध्वनी, दृश्य,

प्रकाश, चित्रे, रंग, तक्ते, भाव दर्शन, स्थळ, दृश्य चित्रण इत्यादींचा नेमकेपणाने उल्लेख संहितेमध्ये करणे गरजेचे आहे. त्यामुळे निर्मात्याच्या मनात संदिग्धता राहत नाही. यासाठी संहितेचे महत्त्व आणि गरज आहे.

संहिता लेखन करताना लेखनकर्त्याने तीन मूलभूत प्रश्न स्वतःला विचारले पाहिजे १-दर्शक कोण आहेत, २-कार्यक्रमाचे उद्दिष्टे काय आहे ३-कार्यक्रमाचा कोणता प्रकार आहे.

या तीन तत्वांचा संहिता लेखन करताना विचार केला पाहिजे.

दूरदर्शन हे केवळ दृश्य माध्यम नाही तर ते दृकश्राव्य माध्यम आहे. डोळ्याइतकेच कानांना, दृश्यइतकेच शब्दांना तेथे महत्त्व आहे. तसे पाहिले असता लेखनाची क्रिया आपणास नवीन नाही. लहानपणापासून आपण काहीतरी लिहीत असतो. पत्र लिहिणे, परीक्षेत उत्तर पत्रिका लिहिणे, बातमी लिहिणे, आकाशवाणीसाठी श्रुतिका लिहिणे डायलॉग लिहिणे, नाटक लिहिणे सगळे लेखन प्रकार आहेत. यापेक्षा दूरदर्शनच्या लेखनाचे स्वरूप वेगळे असते. लेखन करताना तांत्रिक बाबीचे भान ठेवावे लागते. दूरदर्शन हे एक दृकश्राव्य माध्यम असल्यामुळे संहिता लेखन करताना चित्राशी भाषा अवगत असावी लागते. दृश्य सौंदर्य येथे प्रधान असते. शब्दप्रयोग करताना दोन ते तीन सेकंदाचे गॅप दृश्याची लांबी हे घटक गृहीत धरावे लागतात .दृकस्राव्यशक्ती ओळखणारे शब्द प्रयोग लिहिता आले पाहिजेत .संहिता लेखकास दृश्य साक्षात समोर उभे करण्याची क्षमताच हवी. या माध्यमाचे वेगळेपण लक्षात घेऊनच संहिता तयार करावी.

**बातमी संहिता लेखन करताना लक्षात ठेवायच्या बाबी**

बातमी म्हणजे वर्तमानात आपल्या सभोवती घडणाऱ्या घडामोडींची माहिती देणारा मजकूर या बातम्या वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन या माध्यमातून द्वारे आपल्यापर्यंत पोहोचत असतात.

आकाशवाणी व वृत्तपत्रासाठी बातमी लिहिताना लेखकाला बातम्यांची निवड व त्याचे संपादन करायचे असते; परंतु दूरदर्शनवरील बातम्यांना निवेदनासोबतच चल चित्राची जोड असल्याने लेखकाला बातम्यांची निवड, संपादन याचबरोबर बातम्यातील विश्रांती स्थान ठरवून त्या ठिकाणी दाखवल्या जाणाऱ्या चल चित्राची योजना लक्षात घेऊनच बातमी लेखन संहिता करावी लागते. दृश्य आणि लेखन याची सुसंगती साधण्याची जबाबदारी संहिता लेखन करताना लक्षात घेतली पाहिजे.

**दूरदर्शन साठी बातमी संहिता पुढील क्रमाने येणे आवश्यक**

१-प्रेक्षकांना अभिवादन

२-दिवसभरातील हेडलाईन्स

३-ठळक बातम्या संदर्भाने अधिक माहिती


Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by: Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

४-बातम्यांची विविधता असते  जसे नृत्य, नाट्य, संगीत ललित, कला, चित्र, खेळ क्रीडाविषयक,कृषी, निषेध, मोर्चा, आंदोलने, स्पर्धा, राजकीय घडामोडी, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय घडामोडी, अर्थविषयक बातम्या, राष्ट्रीय कार्यक्रम, शेती विषयक इत्यादी प्रकारांची माहिती दृश्यचित्र उल्लेख बातमी लेखनात असावे.

५-हवामान वृत्त

६-पुन्हा एकदा ठळक बातम्या

७-इथेच वेळ झाली थांबण्याची नमस्कार असे प्रेक्षकांना केलेले अभिवादन.

असा क्रम बातमी संहिता दूरदर्शन साठी लिहिताना ठेवाव

**दूरदर्शनसाठी बातमीची संहिता लिहिताना घ्यावयाची दक्षता**

१-दूरदर्शनवर सादर केले जाणारे कार्यक्रम आबालवृद्ध , सर्व स्तरातील लोक पाहतात त्यामुळे प्रेक्षकांचे गट लक्षात घेऊन संहिता लेखन करावे

२-संहिता लेखनाची भाषा अलंकारिक असू नये. सोप्या भाषेत संहिता असावी. क्लिष्ट बोझड भाषा वापरू नये.

३-'खालील प्रमाणे,' 'वर सांगितल्याप्रमाणे' असे अस्वाभाविक शब्दप्रयोग संहिता लेखनात येऊ नये .

४-मुद्रित लेखनात आपण इतरांचे म्हणणे अवतरण देऊन देत असतो. दूरदर्शनच्या लेखनात अवतरणे न देता मजकूर प्रभावी भाषेत मांडला पाहिजे.

५-द्विअर्थी शब्द टाळावे .

६-उच्चारण सुलभ शब्दयोजना, भाषेचे नाद माधुर्य संवाद, संवादात्मकता संहिता लेखन करताना लक्षात घेतले पाहिजे.

७-कोणत्याही व्यक्तीचे चरित्र हनन म्हणून होणार नाही किंवा कोणत्याही जाती धर्माविषयी अनुदान उद्गार निघणार नाहीत याची जबाबदारी संहिता लेखन करताना घ्यावी.

८-दाखवले जाणारे दृश्य व त्याबरोबर बोलणे जाणारे शब्द याचा सुयोग्य मेळ बसणे अत्यंत महत्वाचे आहे संहिता लेखन करताना ध्यानात ठेवावे.

९-वर्णन विषय लक्षात घेऊनच संहिता लिहावी.

१०-कोणत्या रचना प्रकारासाठी संहिता लिहीत आहोत याचे भान ठेवावे .उदाहरणार्थ माहितीपट, मालिका, मुलाखती, बातमी, पटकथा, संवाद इत्यादी प्रकारांची माहिती घेऊनच संहिता तयार करावी.

११-छोटी व सुटसुटीत वाक्य लिहावी लांबलचक वाक्य ऐकून समजून घेणे अवघड जाते.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

१२-दैनंदिन व्यवहारातली भाषा संहिता लेखनासाठी वापरावे आडबोली वापरू नये उदाहरणार्थ 'पचका होणे', ऐवजी 'फजिती होणे'.

१३-अनावश्यक तपशील टाळावा उदा. एखाद्या उद्घाटन प्रसंगी हे मान्यवर उपस्थित होते.

१४-कालदर्शक नामे तपशील वापरावा उदा. काल, परवा, मागच्या वर्षी.ईत्यादी.

१५-नकारात्मक वाक्यरचना टाळावे.उदा.' उद्यापासून पन्नास हजार रुपयावरची रक्कम काढता येणार नाही' याएवजी 50 हजार रुपयांपर्यंतची रक्कम काढता येईल असे म्हणणे अधिक चांगले.

१६-व ऐवजी आणि हे उभयान्वयी अव्यय वापरावे. उदा. 'मुख्यमंत्र्याच्या हस्ते संचालक व उपसंचालक यांचा सत्कार करण्यात आला', असे न म्हणता मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संचालक आणि उपसंचालक यांचा सत्कार करण्यात आला असे म्हणावे.

१७-दृश्यांना पूरक लेखन असावे. दृश्यांमध्ये दिसणाऱ्या तपशिलाची शब्दांमधून पुनरुक्ती नाकारण्याची खबरदारी घ्यावी.उदा. मुख्यमंत्री गुलाबी कोट घालून स्टेजवर आले त्यांच्यासोबत पिवळा कोट घालून उपमुख्यमंत्री आले दोघांनी उपस्थितांना हात उंचावून अभिवादन केले खरंतर येथे दृश्य स्पष्ट दिसत आहे हे सांगण्याची गरजच नाही. परंतु ते ठरलेल्या वेळेपेक्षा उशिरा आले हे मात्र सांगणे गरजेचे वाटते. संहितेत ते लिहून दिले पाहिजे.

अशा प्रकारची वरील कौशल्य संहिता लेखन करताना आत्मसात करावी तसेच संहितीची रचना किंवा मांडणी करताना काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे त्या पुढील प्रमाणे संहिता लेखक व निवेदक या दोन व्यक्ती भिन्न आहेत. संहिता लेखन कर्त्याने लिहिलेले, निवेदकाला वाचायला सोपे जावे यासाठी संहितेची मांडणी करताना पुढील पथ्य पाळावी.

**बातमीची मांडणी (स्ट्रक्चर)**

१-अलीकडे स्क्रीनवर वृत्त निवेदक बातम्या वाचत असला तरी साहित्याचा ड्राप देणे आवश्यक

२-एका पानावर एकच बातमी लिहावी

३-काही आकडेवारी द्यायची असल्यास मोठे आकडे शब्दात लिहावे उदा 50 लाख.

४-संक्षिप्त रूपे उपचाराची पद्धत स्पष्ट करावी. उदा.पं .प्र .असे न लिहिता पंतप्रधान, असे लिहिले पाहिजे. मा.मु. असे न लिहिता माननीय मुख्यमंत्री असे स्पष्ट शब्दात लिहावे.

५-एका ओळीवर शब्दाचा अर्धा भाग व दुसऱ्या ओळीवर उरलेला अर्धा भाग अशा पद्धतीने शब्द तोडू नये. तसेच एका पानावर दुसऱ्या पानावर जाताना वाक्य तोडू नये.

अशा प्रकारे दूरदर्शन बातमी संहितेची रचना असावी.

निष्कर्ष:-१-दूरदर्शन साठी चित्राची भाषा संहिता लेखकाला आत्मसात करावी लागते

२-संहिता लिहिणाऱ्याने दृश्य उभे करण्याची क्षमता ठेवावी. कारण त्याला प्रेक्षकांशी दृश्यातूनच बोलायचे ,संवाद साधायचा असतो.

३-ध्वनी नियोजनाचे रहस्य समजून घेतले पाहिजे.

४-प्रेक्षकांच्या मनावर प्रभावी दृश्य निर्मितीचा प्रत्यय घडला पाहिजे त्यासाठी अति दूरदृश्य, मध्य दूर दृश्य, समिप दृश्य याबाबत निर्देश संहिता लेखन करताना असावे.

**सारांश:**

प्रसारमाध्यम हा मानवी जीवनाचा दैनंदिन भाग आहे .आजच्या विज्ञान, तंत्रज्ञान ,माहिती युगात दूरदर्शन व त्या सारखी अनेक माध्यम प्रभावी आहेत. परंतु दूरदर्शनचे महत्त्व कमी झाले नाही.

अजूनही लोक दूरदर्शनवरच्या बातम्या ऐकण्यासाठी प्राधान्य देतात.

दूरदर्शनच्या प्रेक्षकाला डोळ्यांनी दिसणारी दृश्य आणि कानाने ऐकणारे शब्द ह्या दोन्ही गोष्टी चा मेळ घालून माहिती समजून घ्यावी लागते. वर्तमानपत्र वाचत असताना केवळ लिखित शब्दच आपण वाचत असतो इथं पाहण्याचा ऐकण्याचा संबंध येत नाही. वर्तमानपत्रातील बातमी कोणत्या क्रमाने वाचायचे हे ठरवण्याचा अधिकार वाचकाला असतो. असे स्वातंत्र्य दूरदर्शनच्या प्रेक्षकाला नसते एखादे दृश्य बातमीतून दाखविले किंवा ऐकविले ते पुन्हा ऐकण्याची सोय उपलब्ध नसते म्हणून बातमी लेखन संहिता ही सुलभ वैशिष्ट्यपूर्ण असावी. या माध्यमातून घटना थेट जशीच्या तशी पोहोचण्याचे सामर्थ्य असते. येथे दाखवायचे जास्त, बोलायचे कमी असल्याने भाषिक वापर नेमका व अर्थपूर्णच करावा लागतो. त्यासाठी संहिता लेखन वैशिष्ट्यपूर्ण असावे लागते.

संदर्भ:

१. डॉ. भास्कर शेळके,संपा.२०१२ प्र .आ., स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा.

२. डॉ. देविदास खोडेवाड,प्र.आ.२०२३, विद्या बुक पब्लिशर्स ,संभाजीनगर, प्रसार माध्यमासाठी लेखन कौशल्य आणि कार्यालयीन मराठी भाषा.

३. संदीप सांगळे, २००७,प्र.आ. प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रसार माध्यम आणि पत्रकारिता.

४. जमलीन, सुझन ब्राऊन,२००२,प्र.आ. डिंपल प्रकाशन लखनऊ, न्यूज रायटिंग अँड रिपोर्टिंग.

५. केवल कुमार, २०१०,प्र.आ. डायमंड प्रकाशन, दिल्ली, मास कम्युनिकेशन.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 263-269

:::. Cite this article .:::

मोरे, प्रा. विक्रम उकर्डा. (2024). दूरदर्शनवरील बातमी संहिता लेखनाची वैशिष्ट्ये. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 263–269.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.53

© 2024, SK Publisher All Rights Reserved